# गांधीवादी विचारसरणी : एक जागतिक वारसा

प्रा. डॉ. आनंदराव रा. शिंदे
सहाय्यक प्राध्यापक,
लोकप्रशासन विभाग
कै. बापुसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,
हणेगांव ता. देगलूर जि. नांदेड, महाराष्ट्र राज्य, भारत
anandshinde8008@gmail.com

**सारांश**

भारताच्या वर्तमान सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक जडणघडणीमध्ये गांधीविचारांचे मोठे योगदान राहिलेले आहे. विदेशात नेहमीच भारताची एक वेगळी तथा चांगली ओळख ही गांधीजींच्या विचारामुळे राहिलेली आहे. गांधीजी एक व्यक्ती म्हणून ते केव्हाच जागतिक झालेले आहेत. त्यांचे कर्तृत्व हे भारताच्या सीमा ओलांडून तेव्हाच वैश्विक झालेले आहे. त्यांचा वैचारीक वारसा, त्याग, राष्ट्रसाठी त्यांनी केलेली सेवा ही समस्त भारतीयासाठी केवळ अभिमानास्पदच नाहीतर उपकारास्पद आहे. "भावी पिढ्यांना खरेही वाटणार नाही, की हाडामांसाचा असा कुणी या पृथ्वीवर होऊन गेला," जगविख्यात वैज्ञानिक अल्बर्ट आइनस्टाइन यांनी म. गांधीसंदर्भात काढलेले हे उदगार गांधीजींच्या भारत आणि जागतिक योगदानाचे मूल्य अधोरेखित करते. तथापि वर्तमान परिस्थिती आणि वर्तमान घटना–घडोमोडींचा अन्वायार्थ लावत गांधीजींच्या तत्कालीन भूमिका आणि विचारांची प्रासंगिकता तपासण्याचे प्रयत्न आणि त्यातील गुण–दोष शोधण्याचा प्रकार तथाकथीत विचारवंताकडून होताना दिसत आहे. परंतु तत्कालीन परिस्थितीमधील गांधीजींच्या विचाराचा अंतरस्थ हेतू हा देश उभा करण्याचा होता, घडवण्याचा होता; हे भाण मात्र आपण विसरतो. अनेक पंथ, जाती–धर्म, कमालीची वैविध्यता सांभाळत आज जो खंडप्राय भारत अखंड उभा आहे त्याची पायाभरणी गांधीजींच्या उदारमतवादी–मानवतावादी विचारात असल्याचे दिसते. त्यांनी त्याकाळी घातलेल्या वैचारीक पायावरच भारत देशाचे आजचे स्वरुप टिकवून राहिल्याचे दिसते.

**सूचक शब्द** सत्य, अंहिसा, सविनय, सत्याग्रह, मूल्यनिष्ठा

## I. विषय ओळख

म. गांधी आणि गांधीवादी विचारसरणी ही भारताने जगाला दिलेली एक अनोखी देन आहे. म. गांधी यांच्या कामगिरी वा कर्तृत्वाचे मूल्य आणि मापन हे केवळ भारतीय स्वातंत्र्य लढ्यापुरते करणे हे त्यांच्यावर केला गेलेला अन्यायच नाही तर त्यांच्या कर्तृत्वाचा अनादरही ठरतो. शिवाय त्यांच्या कर्तृत्वाच्या सीमा भारतापुरते सिमित ठेवणे आणि विशेषतः भारतीयाकडून हे घडणे म्हणजे तो एक प्रकारचा त्यांच्याप्रति केला गेलेला अपमर्दच ठरतो. गांधीजींचे असे एकांगी मूल्यमापन सर्वार्थाने चुकीचे असून त्यांनी पार पाडलेली कामगिरी हे केवळ भारतापुरती अथवा भारतासाठी मर्यादीत होती असे नाही; तर अखिल मानवी कल्याणाची प्रेरणा ही त्यांच्या आचार आणि विचारात होती. जागतिक स्तरावरील अनेक साहित्यिक, विचारवंत, तत्वज्ञ यांचा समकालीन गांधीजी विषयीचा दृष्टीकोण अभ्यासला असता याची प्रचिती येते. वास्तविक अलिकडील काळात सोशल मिडीयामधून व काही तथाकथीत लेखक विचारवंताकडून त्यांच्याविषयी अथवा समकाळात त्यांनी घेतलेल्या विविध निर्णयाबाबत तर्क–कुतर्क काढून आधारहिन लेखन तथा विविध व्यासपिठावरुन त्यांच्याबाबत मते मतांतरे मांडली जात आहेत ती खऱ्या अर्थाने आपणच आपला जागतिक दर्जाचा वैचारिक वारसा पुसण्याची चुक किंवा पाप करत आहोत. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. समकालीन परिस्थिती, त्याकाळाची गरज आणि भविष्यातील भारताची सर्वांगीन उभारणी या सर्व बाबींचा सारासार विचार करुन त्यांनी प्रत्येक कृती अथवा निर्णय घेतलेला आहे ही दुसरी बाजू समजून घेण्याची तसदी आजची तरुण पिढी करीत नाही; हे दुःख आहे. शिवाय गांधीजी आणि गांधीवादी विचारसरणी मिटवण्याचे प्रयत्न करणारी व त्यासाठी षंढयंत्र आखणाऱ्या, वैचारीक भ्रम निर्माण करणाऱ्या तथा तसा बुध्दीभेद करणाऱ्या टोळीच्या प्रयत्नाला बळी पडणाऱ्या लोकांची संख्यासुध्दा आता वाढताना दिसून येत आहे. अर्धवट ज्ञानाच्या आधारे गृहितक मांडणाऱ्या किंवा जाणीवपूर्वक वैचारीक गोंधळ निर्माण करणाऱ्या कलम कसायांच्या कारस्थानाला बळी पडणाऱ्या तरुण वर्गाला खऱ्या अर्थाने गांधी समजून घेण्यासाठी गांधीजीविषयी भारतासह विदेशातील विद्वनांकडून झालेल्या लेखनाचे वाचन होणे आवश्यक आहे. आज 21 व्या शतकाची वाटचाल करीत असताना जगभरातील अनेक देश गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता समजून घेवून नवीन पिढीला गांधी विचारांची ओळख आपल्या पाठ्यक्रमातून करुन देत आहेत. भारतात मात्र गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता यावर चर्चा–परिसंवाद घडतात. याचा अर्थ गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता संपलेली आहे की काय? किंवा गांधीवादी विचार हे वर्तमानात कालबाह्य झाले की काय? अशी शंका यातून निर्माण होते अथवा केली जात आहे काय? याचीच शंका येताना दिसते. एका बाजूला अनेक देश गांधीवादी विचारसरणी एक समृध्द वैचारिक वारसा म्हणून जोपसण्याचा प्रयत्न करीत आहेत तर भारतात मात्र त्यांच्या विचारसरणीचा उपहास 'मजबूरी का नाम महात्मा गांधी' म्हणून केला जातानाही दिसतो. प्रस्तुत लेखातून त्यांना अथवा त्यांच्या विचाराला न्याय देण्याचा वैगरे प्रयत्न केलेला नसून किंबहुना त्यांना न्याय देण्याइतपत आपली कुवतही नाही; परंतु प्राप्त वर्तमान परिस्थितीत गांधीजी आणि त्यांच्या विचाराविषयी जग काय भूमिका घेते आहे? त्यांनी दिलेला वैचारिक दृष्टीकोण कशाप्रकारे शाश्वत आहे?

अन्यायाविरुध्द लढण्यासाठी त्यांनी दिलेले शस्त्र आणि आयुधे ही दीर्घकालीन उपयोगाची कशी आहेत? याची ओळख तरुण पिढ्यांना होणे काळाची गरज आहे. शस्त्राच्या आधारे मिळवलेल्या विजयापेक्षा सत्य आणि अहिंसेच्या आधारे मिळवलेला विजय हा कधीही शाश्वत आणि चिरकालीन ठरतो याची अनुभूती गांधीजींच्या जीवनकार्याचा अभ्यास केल्यानंतर होऊ शकते.

**I. गृहितके**

1. भारताच्या सर्वांगीण जडणघडणीमध्ये गांधीविचारांचे योगदान सर्वाधिक आहे.
2. गांधीजी हे व्यक्तीमत्व जागतिक आहे.
3. भारताची जागतिक ओळख गांधीजीं ही आहे.
4. गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता आजही आहे.
5. भारतातील गांधीद्वेष हेतूपूर्वक आहे.

**II. उदिष्ट्ये**

1. गांधी विचारसरणीचे जागतिक मूल्य शोधणे.
2. भारताच्या स्वातंत्र्योत्तर जडणघडणीमध्ये गांधीजींच्या विचारांचे योगदान तपासणे.
3. गांधीवादी विचारसरणीचा सद्यकालीन द्वेष आणि त्याची मुळे शोधणे.
4. राष्ट्रीय एकात्मकता आणि सामाजिक समरसता यातील गांधीजींच्या योगदानाचे मूल्यमापनात्मक आढावा घेणे.

**III. संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध लेखासाठी अन्वेषनात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला असून मूख्यत्वे दुय्यम स्त्रोतातील उपलब्ध साधनांचा उपयोग यासाठी करण्यात आला आहे. सदरील शोध निबंधासाठी संदर्भ ग्रंथ, तज्ज्ञ विचारवंताचे लेख आणि इंटरनेटवरील उपलब्ध अधिकृत संकेतस्थळावरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

भारतीय प्राचीन महाकाव्यामध्ये अवतारी पुरुषांची कल्पना आहे. जेव्हा समाजात अधर्म वाढतो अर्थात जेव्हा–जेव्हा समाजाला महारापुरुषांची गरज असते; अशा वेळेस महापुरुषांचा अवतार जन्म घेत असतो आणि अन्याय दूर करीत असतो अथवा समाजोध्दाराचे कार्य करीत असतो अशी संकल्पना आहे. असा दैवी अवतार हा युगेनयुगे अशा स्वरुपाचा सांगितला जातो. या कल्पनेनुसार यातील पौराणिकत्व (Mythological) वगळून म. गांधीजींच्या कार्य आणि कर्तृत्वाचा लेखाजोखा मोजल्यास मागील शतकात जागतिक स्तरावर सर्वाधिक केंद्रबिंदु राहिलेले व्यक्तीमत्व म्हणजे म. गांधी हे होय. असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. अर्थात म. गांधी हे दैवी किंवा अवतारी पुरुष होते असे म्हणण्याचे धाडस आणि कारणही नाही. परंतु ते त्यांच्या समकाळात आणि त्यांच्या पश्चातही दीर्घकाळ प्रशंसा आणि त्याचबरोबर टीका या दोन्हीचे धनी राहिलेले आहेत. त्यांच्या हयातीतच त्यांना 'महात्मा' आणि 'अर्धनग्ण फकिर' अशा दोन्हीही उपमा देण्यात आल्या. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान आणि राष्ट्रनिर्मितीसाठी त्यांनी दिलेला वैचारिक दृष्टीकोण याबदल त्यांना राष्ट्रपिता, तर फाळणीसाठी जबाबदार म्हणूनही त्यांची निर्भत्सना केली गेली. महात्म्य प्राप्त करुनही ते कुचेष्ठाचा विषयही राहिलेले आहेत. गांधीजींच्या खूनास आता पाऊनशे वर्ष होत आहेत तरी अजूनही दररोज 'गांधीवध' होताना दिसून येतो. (त्यांच्या टीकाकारांकडून खूनाच्या ऐवजी 'गांधीवध' हा शब्दप्रयोग केला जातो कारण त्यांच्या दृष्टीने गांधीजी दूष्ट होते. आणि वध हा दूष्टाचा केला जातो अशी त्यांची धारणा आहे) परंतु व्यक्ती मारल्याने त्यांचे विचार मरत नसतात. हे इतिहासाने पून्हा–पून्हा सिध्द केले आहे. त्यांचे वैचारीक तत्वज्ञान आणि कार्य या दोन्ही आधारावर भविष्यात जगाच्या अंतापर्यंत ते अजरामर राहणार हे निश्चितच! जेथे संघर्ष वा युध्द तेथे गांधीविचारांची प्रासंगिकता अधिक उपयोगाची वाटणार असा हा चिरकालीन वैचारीक वारसा जागतिक कसा आहे हे पुढील मुद्याआधारे अधिक स्पष्ट होईल.

**IV. वर्गसंघर्षाकडून सामाजिक समरसतेकडे**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अनेक पक्ष, संघटना, संप्रदाय, विचारवंत, नेते, समाजसुधारक होते. अनेक धार्मिक सांप्रदायिक स्वरुपाच्या संघटना व संस्थाही होत्या. प्रत्यक्ष– अप्रत्यक्ष, परोक्ष अपरोक्ष, सशस्त्र–निशस्त्र अशा विविध मार्गांनी वेगवेगळ्या वैचारिक दृष्टीकोण असणाऱ्या संस्था–संघटनाही सहभागी होत्या. परंतु या सर्व प्रवाहांना एका विचारधारेत आणण्याचा प्रयत्न केवळ म. गांधीजींनी केला असे म्हटले तर धाडसाचे ठरणार नाही. अर्थात त्यात ते किती यशस्वी झाले हा वेगळा संशोधनाचा विषय ठरु शकेल. त्यांच्या प्रार्थनेमध्येही रघुपती राघवासोबत ईश्वर अल्लाही होता. ज्या पध्दतीने त्यांना भगवतगितेमधील कर्मयोग आवडायचा त्याचबरोबर त्यांना येशूची पठावरील प्रवचणे भावायची. बुध्दाची सत्य आणि अहिंसा हे तर त्यांच्या जीवनाचे तत्वज्ञान होते. खिलापत चळवळीला पाठींबा देवून त्यांना मुसलमानाचे लांगूनचालून करावयाचे नव्हते तर स्वातंत्र्यअंदोनाच्या चळवळीत मुसलमांनाचा सहभाग आणि स्वतंत्र भारताच्या वाटचासाठी धार्मिक सौहार्दचे वातावरण तयार करावयाचे होते. त्यांनी स्वप्न पाहिलेल्या स्वतंत्र भारताचे चित्र हे जात धर्मनिरपेक्ष असे होते. राखीव मतदारसंघाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेला विरोध करण्याचा त्यांचा मुळ हेतू हाच होता की, भविष्यातील भारत हा जातीनिर्मुलित असावा. म. गांधीजींना मानणाऱ्या अर्थात गांधीवादी विचारधारेतील त्यांच्या अनुयायानीही त्यांना अनेक विषयावर विरोध केला होता. तर दुसऱ्या बाजूला गांधीवादी विचार

न पटणाऱ्या लोकांतही त्यांचे समर्थक होते असे म्हणण्यास जागा आहे. स्वातंत्र्य अंदोलनातील साधने आणि चळवळी याविषयी त्यांचे आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यात वैचारिक मतभेद होते. परंतु दोघांचे साध्य एकच होते. शिवाय दोघांनाही एकमेकांचा अपार आदर होता. अलिकडील काळातही गांधीजींच्या विचारावर टीका करणाऱ्या किंवा गांधी विचाराचा तिरस्कार करणाऱ्यानाही गांधीजीशिवाय पर्याय नाही. कारण देशाबाहेर भारताची ओळख गांधीजीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही आणि गांधीजी किंवा त्यांच्या विचारांना वगळून जगात आपणाला कुणी ओळखेल याची शाश्वती नाही.

म. गांधीजींच्या रुपाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला एक सर्वसमावेशक नेता मिळालेला होता. त्यांच्या अनुयायांमध्ये जसे श्रीमंत होते तसे गरिबही होते, जसे उद्योगपती–कारखानदार होते तसेच कामगार–कष्ठकरी होते, शहरी–ग्रामीण, शिक्षित–अडाणी, हरिजन–गिरीजन, उच्चवर्णीय–दलित, हिंदू, मुस्लिम, पार्सी, बौध्द असा सर्व समाजघटक त्यांच्या अंदोलनात समाविष्ट होता. यातील प्रत्येक घटकाला गांधी हा आपल्यातीलच एक वाटायचा. याचे कारण त्यांनी देशासाठी उभा केलेला केवळ लढा नव्हे, किंवा देशासाठी त्यांनी वाहिलेले आपले आयुष्य हे ही नव्हे तर देशसाठी त्यांनी केलेल्या प्रत्येक कृतीमागील साधनसूचिता ही होय. ते नेते होते परंतु पदाची अपेक्षा त्यांनी केली नाही. विद्वान होते परंतु विद्वत्ता दाखवली नाही, ते हिंदू (सुरुवातीला कर्मठ) होते परंतु हिंदूत्ववादी नव्हते. जे होते ते त्यांनी कधी दाखवण्याचा प्रयत्न केला नाही. जणू आपले जीवन हे त्यांनी राष्ट्रसाठी अर्पणच केलेले होते. निष्काम वृत्ती ही त्यांच्या जीवनाचे सूत्र राहिलेले होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर त्यांनी भारतीय राजकारणातील आपली भूमिका संपल्यागत त्यागी वृत्ती अंगिकारलेली होती. नेल्सन मंडेला, ऑग सान सु की, जार्ज वॉशिंगटन असे अनेक उदाहरणे आहेत की ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतरही देशाच्या राजकरण व सत्ताकारणात सक्रिय राहिले, पद भूषविले. परंतु याला गांधीजी अपवाद आहेत. नाहीतरी राष्ट्रपिता गांधीजींना राष्ट्रपती किंवा प्रधानमंत्री होणे कठीण नव्हते.

म. गांधीनी देशाला एकच वेळेस नाही तर अनेकदा वर्गसंघर्षाकडून एकात्मतेकडे घेवून जाण्याचा प्रयत्न केला आहे. देशाच्या फाळणी संदर्भाने अनेकदा त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करण्याचा प्रयत्न होताना दिसून येतो परंतु तत्कालीन उदभवलेली नाजूक परिस्थिती व निर्माण झालेला हिंसाचार पाहता फाळणीला त्यांनी दिलेली संमती योग्यच होती. वास्तविक वेगळ्या पाकिस्तानची मागणी ही काही एका दिवसातून आलेली नव्हती. 1906 मध्ये जरी मुस्लिम लीगची स्थापना झाली असली तरी वेगळया विचाराची मानसिकता तिच्याही अगोदरची असू शकते. भारतावरील सातशे–आठशे वर्षाच्या मुस्लिम राजवटीनंतर तथा इंग्रजांच्या जाण्यानंतर भारताचे भावी राज्यकर्ते हिंदू असतील हे लक्षात आल्यानंतर हा विचार पुढे येणे साहजिक आहे. परंतु गांधीजींना सर्वधर्मीय लोकांचा स्वतंत्र भारत हवा होता. दूर्दैवाने तो अस्तित्वात येऊ शकला नाही. खरेतर ज्यांचा फाळणीला विरोध होता किंवा फाळणीमुळे देशाचे नुकसान झाले आहे अशी धारणा असणाऱ्यांसाठी उलट चांगले झाल्याचे दिसून येते. फाळणीमुळे अंखड भारताचा थोडाफार भूभाग गेला असेल परंतु द्विराष्ट्र सिध्दांताचे समर्थन करणारे तथा देशाशी भविष्यात कधीही एकरुप होऊ न शकणारा एक मोठा जनसमूह पाकिस्तानात गेला. शिवाय फाळणी झाली नसती तर अखंड भारताच्या संसदेतील संख्याबळ कसे राहिले असते याची कल्पना आली असेलच.

देशाच्या फाळणीसाठी गांधीजींना जबाबदार धरणारे टीकाकार तत्कालीन घटनाक्रमाची दखल घेत नाहीत. वास्तविक ज्यांनी सुरुवातीपासून फाळणीचा आग्रह धरलेला होता आणि फाळणीशिवाय पर्याय शिल्लक ठेवलेला नाही असे लोक फाळणीला जबाबदार असतात का? "माझ्या देहाचे तुकडे झाल्यानंतरच या देशाचे तुकडे करा असे म्हणणारे निःशस्त्र गांधीजी जबाबदार असतात? हिंदू आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत असे म्हणणारे सर सययद अहमद ते महंमद अली जीना हे फाळणीला जबाबदार, की? इंग्रजाविरोधी संघर्षात मुसलमान व हिंदू एकत्र असावेत म्हणून लखनौ करार करणारे टिळक आणि त्याच हेतूने खिलापतची चळवळ कॉंग्रेसला करायला लावणारे गांधी जबाबदार असतात?"[1]

## V. श्रमप्रतिष्ठा आणि श्रमसंस्कृती

देशाच्या स्वातंत्र्यासोबतच नव्या भारताची पायाभरणी करताना श्रमप्रतिष्ठा व श्रमसंस्कृतीचे संवर्धन आणि जोपासणा करणे ही काळाची गरज म. गांधजींनी ओळखलेली होती. भारतीय समाजव्यवस्थेतील आर्थिक, सामाजिक, आणि संसाधनाबाबतची असलेली मोठी दरी आणि त्यातून निर्माण झालेला एक मोठा वंचित समाज अस्तित्वात आलेला होता. देशाच्या जडणघडणीमध्ये शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्ठकरी–कामकरी या वर्गाचे योगदान महत्वपूर्ण असणार आहे तथापि त्यांच्या कामाला योग्य मोबदला आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांच्या कार्याला सन्मान प्राप्त करुन देणे अत्यंत गरजेचे होते. 'कोणतेही काम हे कमी दर्जाचे नसते' म. गांधीजींचे हे वाक्य कोणत्याही कष्ठकरी व्यक्तीच्या श्रमाचा सन्मान करते. गांधीजींच्या या विचाराच्या प्रभावातूनच देशात श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त झालेली दिसते. देशाच्या स्वातंत्र्यानंतर उणेपावणे साडे पाच महिने गांधीजी हयात होते परंतु त्यांनी घालून दिलेला विचाराचा वारसा पुढील पिढ्यांनी सांभाळल्यामुळे दीर्घकाळ त्यांचा वैचारिक वारसा निर्माण करणारी पिढी आणि नेतृत्व तयार होऊ शकली. अर्थात हा वैचारीक ठेवा आणि वारसा केवळ भारतातच आहे असे नाही. गांधीजींना मानणारे, जाणणारे, त्यांचा विचार आत्मसात करणारे, त्यांचे विचार आणि तत्वज्ञान याचा प्रसार आणि प्रचार करणारे आज जगभर व्यक्ती आणि संघटना

प्रयत्नशील आहेत. आज जग अगम्य अशा स्पर्धेच्या माध्यमातून एका अनाकलनीय व विनाशकारी परिस्थितीच्या उंभरवठयावर उभा असताना त्यातून आशेचा मार्ग केवळ गांधी विचार आणि त्यांच्या शिकवणीत जगाला दिसून येतो आहे. जगभर चालू असलेली शस्त्रअस्त्राची स्पर्धा, संहारक अशी क्षेपणास्त्र, मध्यपूर्वेतील सततचा हिंसाचार, टोकाची धर्मांधता या सर्व घटना पाहून जग एका विनाशाकडे जात आहे ही जाणीव तज्ज्ञांना होत असताना त्यातही गांधीजींची शिकवण हीच जगाला वाचवू शकते हा आशावाद आहे. खरे पाहता जग त्यांच्या विचाराने भारावून गेले असताना भारताला ओळख होण्याआधीच जगाने त्यांना ओळखले आणि मोठे केलेले आहे.

**VI. सविनय कायदेभंगः रचनात्मक विरोधाचे साधन**

शांततामय मार्गाने कुठल्याही स्वरुपाच्या हिंसेशिवाय एखाद्या अन्यायाबाबत सविनय पध्दतीने विरोध करता येतो आणि त्याद्वारे आपले म्हणणे सत्ताधाऱ्यापर्यंत पोहचवता येते. हा अंदोलनासाठी विधायक आणि कल्पक अशा मार्गाचा अविष्कार गांधीजींनी केलेला आहे. पाशवी व जूलमी सत्तेला ती कितीही दमनकारी–दडपशाही स्वरुपाची असली तरी एक दिवस तिच्या कृत्याबद्दल तिला जागृत आणि त्याचबरोबर खाजील करता येते हा विचार गांधीजींनी संविनय कायदेभंगाच्या चळवळीतून जगाला दिला. गांधीजींच्या स्वातंत्र्य अंदोलनाचे वैचारिक अधिष्ठान ही सविनयता ही होती. आधुनिक काळात सरकारच्या चुकीच्या कायदा अथवा धोरणाविरुध्द लोकशाही राष्ट्रांमध्ये अशा पध्दतीने शांततामय मार्गाने विरोध होताना दिसून येतो. लोकांपुढे अशा प्रकारचा रचनात्मक विरोधाचा मार्ग नसेल तर लोक शस्त्र अथवा हिंसेच्या मार्गाचा अवलंब करीत असतात. आणि हिंसेच्या माध्यमातून मिळवलेला मार्ग हा चिरकालीन नसतो. मागील 40 वर्षापासून आफगानिस्तात चालू असलेल्या राजकीय आणि दहशतवादी चळवळींना अशा प्रकारच्या विचाराचे अधिष्ठान नसल्यामुळे तेथे कोणतीही सत्ता स्थिर होताना दिसून येत नाही.

स्वातंत्र्यानंतरही भारतात अनेक मोठी–मोठी अंदोलने व चळवळी झाल्या परंतु बहुतांश सर्व शांततामय मार्गाने व सविनयतेने पार पडली. लोकशाहीमध्ये लोकांना आपले हक्क आणि अधिकार यांची जपणूक करण्यासाठी अशा प्रकारच्या विधायक मार्गाचा अवलंब करण्याचा पर्याय उपलब्ध असेल तर तेथील लोकशाहीचे भवितव्य उज्वल आणि चिरकालीन असते. शासनाच्या ध्येय–धोरण अथवा निर्णय–नीतिविरोधात अशा प्रकारे रचनात्मक विरोधाचे साधन गांधीजींनी आपल्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रयोगाने दिल्यामुळे रचनात्मक बदल पहावयास मिळत आहेत.

**VII. सत्याग्रह आणि असहकार**

अंहिसा ही दुबळयाचे लक्षण असते असा समज असणाऱ्यांनी इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी आपल्या द अफ्रिकेतील वसाहतीचे गव्हर्नर जनरल स्मटस यांना म्हटलेले हे वाक्य लक्षात घ्यावे "तुमच्या कैदेत असताना तुम्ही गांधीला मारले असते, तर इंग्लंडचे साम्राज्य आणखी काही दशके जगावर टिकले असते"[2] एवढेच नाहीतर चर्चिल यांनी गांधीजींचा भारतातील वाढता प्रभाव लक्षात घेता एका ऐतिदेशिय संस्थानिकाला त्यांचा बंदोस्त करावयास सांगितले होते. परंतु ते होऊ शकले नाही आणि गांधीजींच्या रुपात भारताला तारणहार भेटला. गांधीजीपूर्वी देशाला असहकाराचा मंत्र टिळकांनी दिलेला होता. त्यांच्या चतुःसूत्री कार्यक्रमाने ब्रिटीशांना पुरते हैराण केलेले होते. हा अनुभव लक्षात घेता गांधीजींनी उपसलेले असहकाराचे शस्त्र हे इतके प्रभावी होते की, त्यामुळे ब्रिटीश सत्ता हादरली होती हे त्यांचे टीकाकारही मान्य करतात. त्यांच्या एका इशाऱ्यावर अनेकांनी नौकऱ्या सोडल्या, वकिलांनी वकिली सोडली, विद्यार्थ्यांनी शाळा–महाविद्यालये बंद पाडली. देशातील अनेक भागात शेतकऱ्यांनी सारांबंदीची चळवळ राबवली, खिलापत चळवळीने मुसलमानांचाही अभूतपूर्व प्रतिसाद या अंदोलनास मिळाला. पहिल्यांदा गांधीजींच्या नेतृत्वाखाली फार मोठ्या प्रमाणात देश संघटीत होऊन त्यांच्या पाठीशी उभा राहिला. चौरीचौरा येथील घटनेने या अंदोलनास गालबोट लागल्याने गांधीजींनी हे अंदोलन मागे घेतले. परंतु त्याचा परिणाम ब्रिटीश सत्तेच्या मुळावर कुठोरोघात होण्यात झाला. अंदोलनाची दाहकता आणि यश पाहून गांधीजींच्या टीकाकारांनाही त्याचे महत्त्व कळले होते त्याशिवाय हे अंदोलन अर्ध्यावर थांबवल्याने त्यांनी अवसानघातकी म्हणून टीका केली नसती. असहकार अंदोलनाच्या निमित्ताने देशाला एका सूत्रात ओवण्याचे काम त्यांनी केलेले होते. जात–धर्म–पंथ विसरुन लोक स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःला झोकून दिलेले होते. या अंदोलनाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीला एक निर्णायक दिशा प्राप्त होऊ शकली.

गांधीजींच्या अंदोलनाचे दुसरे अस्त्र म्हणजे सत्याग्रह हे होय. असहकाराच्या अंदोलनाप्रमाणे सत्याग्रहाच्या अंदोलनाची टिंगलटवाळी झाल्याचे दिसते. "सुताने स्वर्ग गाठू इच्छिणारा हा महात्मा आता मिठाने मुक्ती मिळवायला निघाला आहे"[3] असा उपाहास त्यावेळी त्यांचा केला गेला. परंतु साबरमतीहून दांडीपर्यंत निघालेली ही यात्रा ब्रिटीश सत्तेसाठी प्रेतयात्रा ठरेल असे सुरुवातीला ब्रिटीशांनाही वाटले नाही परंतु या सत्याग्रहाने ब्रिटीश सत्तेला दुसरा मोठा हदरा देण्याचे कार्य केले. साबरमतीहून निघताना गांधीजीसोबत केवळ 78 साथीदार होते परंतु दांडीला पोहचताच त्यांच्या सोबत सारा देश एकवटल्याचे चित्र जगाने पाहिलेले होते. सत्याग्रहाच्या अंदोलनात इतके आत्मबल होते की, ब्रिटीश सत्तेला तो एक इशारा ठरला. खरेतर देशाच्या स्वातंत्र्यासाठी हाती तलवार घेणारे नेते प्रत्येकच देशात झाले; मात्र त्यासाठी निःशस्त्र लढा देणारा नेता फक्त भारतातच झाला हे या नाविण्यपूर्ण लढ्याचे अप्रुप्य होते.

**VIII. जगातील सर्वात मोठा लोकलढा**

स्वातंत्र्य अंदोलनाच्या पूर्वी भारताचा इतिहास हा राजे—महाराजांचा, त्यांनी केलेल्या लढाया आणि आक्रमणांचा होता. अगदी प्राचीन काळापासूनही ऐतिदेशीय राजांनी कधी स्वकियांशी तर कधी घोरी—गजनी पासून ते मोघल—ब्रिटीशांपर्यंत परकियांशी युध्दे केली. नाही म्हटले तरी 1857 च्या उठावामध्येही येथील राजे—नवाब हे इंग्रजांशी लढले परंतु या सर्व युध्दे आणि लढायामध्ये साम्राज्यविस्तार, गेलेले राज्य परत मिळवणे हा अंतःस्थ हेतू होता. छ. शिवाजी महाराजांसारख्या लोककल्याणकारी एखाद—दुसऱ्या राजांचा अपवाद वगळता या लढाया जनतेसाठी होत्या असे म्हणता येईल असे वाटत नाही. शिवाय या ऐतिहासिक लढायामध्ये सैनिकासोबत जनतेचा सहभाग होता असेही दिसत नाही. त्यामुळे हा इतिहास जनतेचा नाहीतर राजे—महाराजे यांचा स्वतःचा होता. परंतु स्वातंत्र्य अंदोलनातील विविध लढे आणि चळवळी या जनतेच्या होत्या. या चळवळी कोणत्या संस्थानिक अथवा भांडवलदाराच्या मदतीने उभारलेल्या नव्हत्या आणि हा लढा जनतेचा करण्यामध्ये म. गांधीजी एवढे योगदान दुसरे कोणाचेही नाही. सन 1920 पासून ते देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत ज्यांनी प्रत्येक श्वास लोकलढ्याला वाहिला, अहोरात्र ज्यांनी स्वातंत्र्याचे स्वप्न पाहिले ते गांधीजी एकमेव नसले तरी एकमेवाद्वितीयच होते. गांधीजींच्या या लढ्याने राजांचा इतिहास जाऊन देशाला जनतेचा इतिहास मिळाला. स्वातंत्र्याच्या चळवळी चालू असताना अर्धा भारत ज्यांच्या अंमलाखाली होता असे संस्थानिक यांनाही आपल्या डळमळत्या सिंहासनाची जाणीव होऊ लागली होती. "डळमळत्या सिंहासनावर बसलेल्या आणि तिथून गांधींची नालस्ती करणाऱ्या देशभरातील राजे—राजवाड्यांना व संस्थानिकांनाही यापुढे लोक आपल्या नियंत्रणात राहणार नाहीत आणि आपल्या राजवटींची आयुष्येही आता फार उरली नाहीत याची पहिली जाणीव या लढ्याने करुन दिली. राजा व सेनापती नसलेला, धर्मसंस्थापक वा धर्मोपदेशक नसलेला, घराण्याची कोणतीही पुण्याई व संतत्वाची परंपरा नसणारा एक माणूस पुढे जातो आणि जनतेचा प्रवाह गंगौघासारखा त्याच्या मागे जातो— ही गोष्ट देशाच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात प्रथमच घडत होती."[4]

गांधीजीच्या नेतृत्वात झालेला हा लढा विशेषतः 1942 चा चलेजाव हा जगातील सर्वात मोठा लढा मानला जातो. जगातील कोणत्याही लढ्याला एवढे अनुयायी मिळाले नसतील तेवढे गांधीजींना या लढ्यासाठी भेटले होते. गांधीजीच्या 'करो या मरो' या एका घोषणेवर अनेकांनी आपल्या घरावर तुळशीपत्रे ठेवलेली होती. गांधीजींच्या एका इशाऱ्यांने लाखो लोक जगातील सर्वात मोठ्या बलाढ्य अशा इंग्रजी सत्तेशी लढायला तयार झाली होती; ती पण निःशस्त्र. या लढ्याने इंग्रजी राजवटीला तर हादरवलेच त्यापेक्षा जगभरातील अनेक स्वातंत्र्य चळवळींना स्वातंत्र्याची प्रेरणा दिली. साम्राज्यवादी राष्ट्रांना यापुढे आपल्या वसाहतींना स्वातंत्र्य द्यावे लागणार हे कळून चुकले होते.

## IX. सत्य आणि अहिंसा

म. गांधीजींनी स्वतंत्र भारतासोबतच समृध्द आणि सुशिल भारताचे स्वप्न पाहिलेले होते. आर्थिक विकासासोबतच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सांस्कृतिक, मानसिक, वैचारीक अशी चौफेर पायाभरणी करण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यांच्या अंदोलनाचे दोन महत्वपूर्ण शस्त्र म्हणजे सत्य आणि अहिंसा. कोणत्याही अंदोलनासाठी हिंसेचे समर्थन त्यांनी केले नाही. अहिंसेमध्ये जी शक्ती असते ती हिंसेमध्ये नसते. अन्याय करणाऱ्याच्या मनात तो करीत असलेल्या कृत्याविषयी जाणीव करुन देवून त्याचे मतपरिवर्तन करणे हे नवीन तत्वज्ञान त्यांनी जगाला दाखवून दिले आहे. एवढेच नाही तर जगभरातील त्या काळी चालू असलेल्या विविध देशातील स्वातंत्र्य चळवळींना त्यांनी नवा विचार आणि आदर्श दिला. अहिंसा सर्वात मोठी ताकद आहे हे जगातील कोणत्याही हत्यारापेक्षा अधिक ताकदवान आहे. हिंसेच्या मार्गाने एखादी गोष्ट साध्य होते तेव्हा ते यश तात्पुरते असते; त्यामुळे होणारे नुकसान मात्र दीर्घकालीन असते. या हत्याराची तीव्रता इंग्रजांनी समजली होती. भारतीय स्वातंत्र्य अंदोलनाची सुरुवात ही 1857 च्या उठावापासून मानली जाते तथापि या अंदोलनाला धार आली ती 1920 नंतर. 1920 मध्ये म. गाांधीजींचा भारतीय राजकारण आणि स्वातत्र्य अंदोलनात प्रवेश झाला. आणि खरेतर भारतीय स्वातंत्र्य हे दृष्टीपथात आले ते 1920 नंतरच.

"भारताला रक्त सांडून स्वातंत्र्य मिळणार असेल, तर तो माझ्या आनंदाचा व अभिमानाचा विषय असणार नाही, हे स्वातंत्र्य अहिंसेच्या मार्गाने यावे लागेल."[5] द. अफ्रिकेच्या तुरुंगात असताना गांधीजींना अतिशय कष्ठप्रद वागणूक दिली गेली. त्या ठिकाणी गांधीजींनी चामड्याच्या चपला बनविण्याचे कौशल्य आत्मसात केले होते आणि तुरुंगवासात असताना त्यांनी बनविलेला चपला जोड सुटका होताना ब्रिटीश गव्हर्नर जनरल लॉर्ड स्मटस यांना भेट म्हणून दिले. वैर हे व्यक्तीशी नसून व्यवस्थेशी असते हे या प्रसंगातून त्यांनी दाखवून दिले. बोअर युध्दात जखमी झालेल्या ब्रिटीश सैनिकांसाठी त्यांनी संघटना स्थापन करुन त्यांची सुश्रूषा केलेली होती त्यामुळे त्यांना ब्रिटीश सरकारने 'हिंदकेसरी' हा किताब दिलेला होता. त्यामुळे दुश्मनावरही प्रेम करुन मन जिंकता येते हा मानवतावादी विचार पहिल्यांदा म. गांधीजींनी जगाला दिलेला होता. आणि मानवतेसाठी जात, धर्म, पंथ, वर्ण, देश हा अडसर नसतो हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिलेले आहे. द. अफ्रिकेत असतानाच त्यांच्यावर झालेल्या दगडफेक आणि हाणामारी बाबत ब्रिटीश संसदेत पडसाद उमटले होते. त्याचा परिणाम या गुन्हेगाराविरुध्द केसेस दाखल करण्याबाबत त्यांना सरकारकडून आग्रह करण्यात आला होता परंतु मनाचा मोठेपणा दाखवत केस दाखल न करता पुढे त्याच हल्लेखोरांच्या सुखादुखात ते सामिल झाले. द. अफ्रिकेतील काळे—गोरे या वादामध्ये त्यांना अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला होता परंतु आपल्या नात्यागोत्याचे—पंथाचे—धर्माचे वा भारताचे असले नसलेले अशा सर्वांसाठी त्यांनी लढा उभारला होता. त्याचवेळी

जगाला कळले होते की, हा माणूस स्वतःसाठी अथवा आपल्या जातीधर्मासाठी नाही तर सत्य या मूल्यांसाठी लढतो आहे.

दुबळ्याची अहिंसा ही काही उपयोगाची नसते. त्यामुळे पाशवी सत्तेवर त्याचा काही परिणाम होऊ शकत नाही. शिवाय टोकाची आणि सततची अहिंसा ही व्यक्ती आणि राज्याला दूबळी बनवत असते. अशा प्रकारचे विविध प्रवाद आणि प्रतिवाद करताना गांधीजींच्या अहिंसा तत्वाचा उपहास करण्याचा प्रयत्न केला गेला आणि आजही केला जातो. अहिंसेच्या पालनसाठी फार मोठ्या आत्मबलाची आवश्यकता असते. हे त्यांनी पटवून दिलेले होते. परंतु देशहीत आणि राष्ट्रवाद यांची किंमत मोजून तर गांधीजींनासुध्दा अहिंसा नको होती. जम्मु कश्मिरवरील पाकिस्तानाच्या आक्रमणावेळी भारतीय फौजा कश्मिरमध्ये पाठविण्याबाबत गांधीजींनी संमती दिली होती. त्यामुळे अहिंसा ही दुबळ्याची नाही तर बलवानाची असते. आणि त्यासाठी सामर्थ्य आणि मनाचा निग्रह आवश्यक असतो हे त्यांनी आपल्या आचरण आणि विचारातून पटवून दिले आहे. शिवाय गांधीजींची अहिंसा ही संकल्पना केवळ युध्द, लढाया, मारामारी इथपर्यंत मर्यादीत नसून ती फार मोठी व्यापक संकल्पना आहे. अगदी वाणी आणि कृतीच्या माध्यमातूनही कुणाचे मन दुखावणार नाही ही खबरदारी त्यांनी या संकल्पनेसाठी सांगितलेली आहे. त्यांनी आयुष्यभर अहिंसेचा केवळ पुरुस्कारच केला नाहीतर इतरांनाही त्यासाठी प्रोत्साहित केले होते. त्यांच्या अहिंसेच्या संकल्पनेत बुध्दाच्या विश्वकल्याणाचा आणि भगवान महाविरांचा समस्त प्राणीमात्रांना जगण्याचा मार्ग दिसून येतो.

**X. साधी राहणी उच्च विचारसरणीः**

गांधीजींच्या जीवनाचा सर्वात मोठा आदर्श म्हणजे त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी होय. वास्तविक गांधीजींना सुटा—बुटातही वावरता आले असते. स्वातंत्र्य अंदोलने करीत असताना मोठी वस्त्रे व आभुषणेही त्यांना घालता आली असती एवढी त्यांची ऐपत खचितच होती. परंतु जाणीवपूर्वक त्यांनी भारतीय समाजापुढे एक नवा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. म. गांधीजींना नव्या भारतातील नवीन पिढीपुढे आदर्श जीवनाचा वस्तुपाठ ठेवायाचा होता. उपेक्षित, वंचित, भुकेल्या समाजाचे नेतृत्व करताना त्यांच्याशी समरस होण्याची गरज त्यांनी ओळखलेली होती. ज्यांचे आपण नेतृत्व करीत आहोत त्या समाजातील एक मोठा वर्ग अर्धनग्ण आणि अर्धपोटी आहे याची जाणीव होताच त्यांनी साध्या राहणीमानाचा स्वीकार केलेला होता. गांधीजींच्या साध्या राहणीमानाची सुरुवात ही द. अफ्रिकेतील सहवासात झालेली होती. तथापि भारतात आल्यानंतरही त्यांनी इथल्या भारतीयांची स्थिती पाहून नेहमीसाठीच हा पोषाक परिधान करीत राहिले. कमीतकमी गरजानिशी माणसाला कसे जगता येते हे गांधीजींच्या आयुष्याने जगाला अनेकदा दाखवून दिले आहे. ब्रिटीश सत्तेशी वाटाघाटीचा प्रसंग असो अथवा व्हाईसराय यांच्याशी भेट घ्यावयाचा प्रसंग असो अशा प्रत्येक क्षणी त्यांनी आपल्या शरीरावर नेहमीचाच पोषक ठेवलेला होता. तोही स्वतः चरक्यावर कातलेल्या सुताचा. त्यामुळे पंतप्रधान चर्चिल यांच्या पासून अनेकांनी त्यांना 'नंगा फकिर' असे संबोधले आहे. तन—मन—धनाने भारतीय जनतेशी तादम्य पावलेला हा महात्मा आपली ओळख करुन देताना अनेकदा, 'मी भंगी आहे, सूत कातणारा विणकर आहे आणि मजूर आहे' असे म्हटलेले आहे. शुद्रातिशुद्र लोकांशी आपली तादाम्यता स्पष्ट करताना ते एके ठिकाणी म्हणतात, "स्वतःला एक अस्पृश्य, भंगी म्हणून संबोधित आलो आहे ते काही आढ्यतेने किंवा अज्ञानाने नव्हे; तसेच मी पाश्चात्य विद्याविभूषित आहे म्हणून नव्हे; तर त्यामुळे त्यांची सेवा मला चांगल्याप्रकारे करता यावी म्हणून"[6]

जागतिक किर्तीचे साहित्यिक, जगप्रसिध्द कादंबरीकार, थोर तत्वज्ञ टॉलस्टॉय यांच्या लेखी म. गांधीजींचे कार्य त्यांच्याच शब्दांत "मी जो विचार मांडतो तो गांधी जगून दाखवतो"[7] हे प्रतिभावंत जागतिक विचारवंत टॉलस्टॉयचे वाक्य गांधीजी हे व्यक्तीमत्व हे जागतिक होते हे प्रचिती आणून देते. मला पैशाची गरज नाही म्हणून नोबेल पारितोषिक नाकारणारे टॉलस्टॉय हे गांधीजीशी कधी प्रत्यक्ष भेटले नाहीत. दोघांतील त्याकाळी झालेला पत्रव्यवहार पाहिला असता गांधी हा समस्त प्राणीमात्रासाठी लढणारा, धडपडणारा, जगाच्या कल्याणाची अभिलाषा बाळगणारा एक मनुष्य म्हणून त्यांनी म्हटलेले आहे.

गांधीजींनी त्यांच्या समकाळात आपल्या व्यक्तीमत्व आणि कृतृत्वाने जगातील अनेक नेते आणि चळवळींना प्रभावित केले होतेच त्या शिवाय त्यांच्या पश्चातही त्यांच्या विचाराने प्रभावित झालेली हजारो व्यक्ती आजही जगभर सापडतील. अमेरिकतील वर्णभेदाच्या विरोधातील चळवळीला गती देणारे मार्टीन ल्युथर किंग ज्युनिअर ते स्टिव्ह जॉब्सपर्यंत अशी अनेक व्यक्ती आहेत ज्यांच्या आयुष्याला आणि कार्याला म. गांधीजींच्या विचारांची प्रेरणा होती. अफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळीचे प्रनेते नेल्सन मंडेला, व्हिएतनाम स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी हो ची मिन्ह, नोबेल पारितोषिके विजेत्या ऑग सॉन स्यु की, जगप्रसिध्द साहित्यिक जार्ज बर्नाड शॉ, जगप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक लॉर्ड ॲटनबर्ग, बौध्द धर्मगुरु दलाही लामा, जेम्स लॉसन, अमेरिकेचे मागील दशकातील राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यांनी म. गांधीजींच्या विचारांचा केवळ पुरुस्कारच केला नाहीतर; तर त्यांच्या विचाराने आपले आंर्तबाह्य जीवन बदलल्याच्या नोंदी ग्रंथातून केल्या आहेत.

**XI. निष्कर्षात्मक सारांश**

स्वातंत्र्यत्तोर काळात गांधी विचाराबाबत प्रश्न, शंका, समस्या, उपहास, हेटाळणी निर्माण करण्यामध्ये जसे त्यांचे तथाकथीत वैचारिक विरोधक कारणीभूत आहेत तसेच त्यांना मानणारे म्हणविले जााणारे पोथीनिष्ठ गांधीवादीही जबाबदार आहेत. गांधीजींना समजून घेताना त्यांचा बहुलक्ष्यी दृष्टीकोण लक्षात न घेता त्यांच्या विचारातील एक–एक पैलू स्वतंत्रपणे वेगवेगळा मांडल्या गेला. ज्याला जसा जमेल तसा गांधी त्यांनी उचलला आणि त्याची अर्धवट मिमांसा आणि समिक्षा करण्याचा प्रयत्न केला. "कोणी गांधींच्या निव्वळ रचनात्मक कार्यक्रमाला चिकटून बसले तर कोणी गांधींचा वेदान्त (!) सांगत राहिले. कोणी गांधींच्या अहिंसेला शांततावादात गुंडाळू लागले, तर कोणी त्यांच्या विकेंद्रीकरणाच्या विचारास संसदीय लोकशाहीच्या संरचनेत बंदिस्त करु लागले. कोणी गांधींचा निव्वळ पर्यावरणवाद उचलला, तर कोणी निसर्गोपचारवाले झाले. कोणी सर्वधर्मसमभावाची जपमाळ ओढायला सुरुवात केली, तर कोणी भांडवलशाहीपूरक आर्थिक धोरणांची चिकित्सा न करताच चरख्याची पोथी वाचीत बसले."[8]

स्वतःला गांधीवादी म्हणवणारे किंवा त्यांचे शिष्यत्व स्वीकारलेले अनुयायी या दोघांनीही समग्र गांधीजी समाजाला दाखविला नाही. त्यांच्या विचारातील तत्कालीन संदर्भ आणि त्यांची भूमिका न तपासताच पोथीनिष्ठ गांधी समाजापुढे उभा केला. उदा. गांधीजींच्या खादीच्या अर्थशास्त्रामागील तात्त्विक चिंतनाची उपेक्षा करुन खादीला सरकारी गणवेशामध्ये अडकावून टाकण्यात आले. तर त्यांच्या साध्या राहणीमानाचा संबंध दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमाशी जोडण्यात आला. या शिवाय गांधीजींनी राष्ट्रउभारणीमध्ये समतामूलक समाजासाठी अस्पृश्यता निर्मुलन, स्त्री उध्दारासाठी स्त्री–पुरुष समानता, शिक्षणासाठी नई तालिम, संसाधनाच्या योग्य विनियोगासाठी विश्वस्त संकल्पना, सत्ता विकेंद्रीकरण, भागीदारी व स्वालंबनासाठी ग्रामस्वराज्य या संकल्पना मांडल्या परंतु त्यांचा अन्वयार्थ लावण्यामध्ये आणि अंमलबजावणी करण्यामध्ये व्यवस्था आणि समाज चुकताना दिसून येतो. या शिवाय समाजातील वेगवेगळ्या घटकांनी जसा सोयीचा वाटेल तसा गांधी स्वीकारला. "संघर्षावाचून गांधी हा नुसताच सूत कातणारा, शरीरश्रम करणारा आणि शांतीचा उपदेश करणारा संत असतो. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जनशक्ती उभी करुन लढणारा, तुरुंगात जाणारा आणि त्यासाठी प्राण पणाला लावणरा गांधी मग दिसत नाही.... गांधी तरुणांचा आणि त्यांच्या सळसळत्या रक्ताचा नेता होता."[9] हे गांधीदर्शन आजच्या पिढीला होणे आवश्यक ठरते. ज्या पध्दतीने त्यांच्या विचारात विवेक, सविनयता, सहनशीलता, सोज्वळता, शालीनता दिसते, तद्ववत प्रखरता, धैर्य, कणखरपणा आणि लढाऊबाणाही दिसतो. मुख्य म्हणजे गांधीजींच्या कृती आणि विचारांचे अधिष्ठान जे साधनसूचिता होते ते अतिशय दूरगामी परिणामकारक होते; कारण त्यांच्या दृष्टीने साध्यसोबतच साधनांची उचितता अतिशय महत्त्वाची होती. त्यांच्या विचार आणि दृष्टीने समाजाला शाश्वत आणि चिरंतन उध्दाराचा मार्ग दिला आहे.

लौकिक अर्थाने गांधीजींनी हे जग सोडून 72 वर्ष झाली आहेत; परंतु त्यांनी मांडलेले विचार आणि दिलेली दृष्टी आजही प्रासंगिक, कालसुसंगत आणि पथदर्शक आहे. कारण गांधी ही व्यक्ती नसून प्रवृत्ती, विचारधारा आहे; आणि धारा ही नेहमी प्रवाही वाहत असते त्यात साचलेपण नसते. म्हणून कालोघात भविष्यात समाजात निर्माण होणाऱ्या प्रश्न आणि समस्या यांची उत्तरे त्यात मिळू शकतात. अर्थात ती शोधण्याची आणि हेरण्याची सकारात्मक दृष्टी तेवढी आवश्यक आहे.

**संदर्भ**

1. द्वादशीवार सुरेश, गांधीजी आणि त्यांचे टीकाकार, साधना प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती 2019, पृ क्र. 39
2. कित्ता, पृ. क्र. 58
3. कित्ता, पृ. क्र. 49.50
4. कित्ता, पृ. क्र. 49
5. कित्ता, पृ. क्र 103
6. सुमंत यशवंत, महात्मा गांधींची विचारसृष्टी काही अलक्षित पैलू, साधना प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती 2017, पृ. क्र. 115
7. फिशर लुई, (अनुवादः वि. रा. जोगळेकर) महात्मा गांधी जीवन आणि कार्यकाळ, साधना प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती 2019, पृ. क्र. 134
8. उपरोक्त संदर्भ क्र. 6, पृ. क्र. 110
9. उपरोक्त संदर्भ क्र. 1, पृ. क्र. 135